## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ )

जा.क्र. ७९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/१२/२०१६

**१) गोसेखुर्द प्रकल्पात गेलेल्या शेतीच्या पैशाचा मोबदला स्वत: घेवुन भावाची फसवणुक केली :—**

दिनांक ०४/१२/२०१६ पासुन ते आज पावेतो यातील फिर्यादी शंकर लव्हाजी विधाते वय ४९ वर्ष रा. पवना हा व आरोपी हे सख्खे भाऊ असुन त्याचे वडीलोपार्जीत शेत जमीनीचे हिस्से बटवाऱ्या वरून वाद असुन यातील शेती गट क्र. ३७६/०१ आराजी ०.६१ हेक्टर आर ही फिर्यादीचे हिस्याला आली असुन मात्र कागद पत्र हे आरोपीचे नावावर आहे व त्याचे शेतीचे ०.१४ हेक्टर आर शेती ही गोसेखुर्द प्रकल्पात गेल्याने एकुण मिळालेला मोबदला १४,३८,९९०/—रू ची रक्कम आरोपीने फिर्यादीस न देता स्वत: घेवुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी यांनी मा. न्यायालयात फौजदारी किरकोड अर्ज क्र. ०२६७ अन्वये सादर केल्याने मा. न्यायालयाचे आदेशाने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४२०,४०६,१८८ भादंवि.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) अज्ञात ट्रॅक्टर चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी**

दिनांक ०४/१२/२०१६ चे २०.३० वा. दर. यातील फिर्यादी प्रज्ञाशिल श्रीपत घोडेस्वार वय ३० वर्ष रा. परसोडी यांचे भाऊजी जखमी राजेश प्रभाकर गजभिये वय ४८ वर्ष रा. नागपुर हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ४९ ए.एस.१००६ ने भंडारा कडुन नागपुर कडे एनएच ०६ रोडन जात असता यातील अज्ञात आरोपीने ट्रॅक्टर चालकाने आपले ताब्यातील वाहण भरधाव वेगाने, निष्काळजीपणे हायगयीने चालवुन रॉग साईडने चालवुन जखमीचे मोटार सायकलला समोरून धडक मारून गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) आरोपींतांनी संगनमत करून फौजदारी अतीक्रमण करून विटेच्या तुकडयाने हमला करून व्यक्तीगत सुरक्षा धेक्यात आणुन वाहणाची तोडफोड केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०३/१२/२०१६ रोजी २२.०० वा. दर. यातील फिर्यादी हिरामन श्रावण बांते वय ६८ वर्ष रा. तकीया वार्ड पोलीस कॉलोनी भंडारा हे आपल्या घरी हजर असतांनी यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या घराच्या आवारात फौजदारी अतीक्रमन करून त्यांना अश्लील शब्दात शिवीगाळ करून व फिर्यादीवर विटेचा तुकडयाने हमला करून त्याचे जिवीत व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात आणुन वाहनाची तोडफोड करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४४७,३३६,४२७ २९४,५०६(ब), ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०५/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, मोहाडी कारधा, करडी, तुमसर, आंधळगाव, साकोली, व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १७९ लिटर हातभट्टी दारू कि. १२३२०/—रू. व देशी दारू १८० मिलीलीटर देशी दारू कि. ५०/—रू तसेच जुगारातुन कि. १४,२४५/—रू असा एकुण कि. २६,६१५ / —रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.